# महाडिक शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन

**इस्लामपूर : वार्ताहर**

पेठ येथील श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संकुलात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांच्याहस्ते ध्वजवंदन झाले. कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. कुलकर्णी म्हणाले, आधुनिक काळात कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असताना प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाडिक मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष सतीश महाडिक, व्यवस्थापक आर. एम. बागडी, संस्थेचे संचालक राजाराम गायकवाड, प्राचार्य डॉ. कृष्णमूर्ती, बी. प्राचार्या डॉ. वैशाली माने उपस्थित होत्या.